| | |
|---|---|
| दाखल तारीख | २६/०५/२०२३ |
| नोंदणी तारीख | २६/०५/२०२३ |
| निकाल तारीख | ०२/०६/२०२६ |
| कालावधी | ०३वर्षे,००म.,०७दि. |

## भाग अ
## (न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)
## {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (१)}

| | |
|---|---|
| | **निशाणी क.४७** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय**<br>पिठासीन अधिकारी :- योगेश्वर ज. वळवी | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क. ७४/२०२२<br>चामोर्शी पोलिस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०६/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | नियमित फौजदारी खटला क्रमांक ३९/२०२३ |
| | CNR No. MHGA090004482023 |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी, पोलिस ठाणे चामोर्शी. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. एस.एम.सलामे**<br>(सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | शेखर सुरेश साखरे,<br>वय २९, व्यवसाय- मजुरी,<br>रा. आंबेडकर वार्ड चामोर्शी, ता.चामोर्शी, जि. गडचिरोली, |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. ए.एम.तुरे**<br>(आरोपीतर्फे वकील) |

## भाग ब
## {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (२)}

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १३/०३/२०२२ |
| पहिल्या खबरीची तारीख | १४/०३/२०२२ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २६/०५/२०२३ |
| दोषरोपनिश्चीती तारीख | ३०/०६/२०२३ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०९/०१/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०२/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०६/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेखर सुरेश साखरे | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४१ (अ)(१) नुसार सुचनापत्र दिले | २६/०५/२०२३ | भा.दं.वि चे कलम ३२४ व ५०४ अन्वये | भा.दं.वि चे कलम ३२४ साठी दोषसिध्द | अंतिम आदेशा प्रमाणे | लागु नाही |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (३)}**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.कं. १ | उर्मिला बंडु साखरे | फिर्यादी |
| सा.कं. २ | विलास एकनाथ साखरे | पंच |
| सा.कं. ३ | बंडु एकनाथ साखरे | साक्षीदार |
| सा.कं. ४ | डॉ. अनिकेत अवास्ती | वैद्यकिय अधिकारी |
| सा.कं. ५ | सुभाष देवाजी भोयर | तपासी अधिकारी |

**ब. <u>बचाव साक्षीदार, असल्यास</u> :**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा स्वरूप** |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**क. <u>न्यायालयीन साक्षीदार, असल्यास</u> :**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा स्वरूप** |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| अ.कमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी/**पी-२५**/सा.क.१ | रिपोर्ट |
| २ | निशाणी/**पी-२६**/सा.क.१ | एफ.आय.आर. |
| ३ | निशाणी/**पी-२७**/सा.क.१ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | निशाणी/**पी-२८**/सा.क.१ | जप्तीपत्रक |
| ५ | निशाणी/**पी-३१**/सा.क.२ | सुचनापत्र |
| ६ | निशाणी/**पी-३७**/सा.क.४ | पत्र |
| ७ | निशाणी/**पी-३८**/सा.क.४ | एम.एल.सी. रिपोर्ट |
| ८ | निशाणी/**पी-४१**/सा.क.५ | पत्र |
| ९ | निशाणी/**पी-४२**/सा.क.५ | चेहरेपटटी फार्म |

**ब. बचावपक्ष :**

| अ.कमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| | **--निरंक--** | |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.कमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| | **--निरंक--** | |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क. | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| ०१ | वस्तुचिन्ह अ | ब्लेड |

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०२ जुन २०२६ रोजी घोषीत)

आरोपीवर भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ अन्वये आरोप ठेवुन खटला चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात खालीलप्रमाणे आहे :

अ) फिर्यादी उर्मिला बंडु साखरे यांनी चामोर्शी पोलीस स्टेशनला खबर दिली की, दि. १३.०३.२०२२ रोजी रात्री ०७.३० वाजताच्या दरम्यान विदया सुरेश साखरे व दिक्षा विलास साखरे या दोन्ही तिच्या जावा असुन त्यांचे जुन्या वादावरुन भांडण झाले. त्यानंतर दोन्ही महिला पोलिस स्टेशनला रिपोर्ट देणे करीता गेल्या आणि

तिचा पुतण्या शेखर साखरे हा घरीच होता. तेव्हा फिर्यादी नात्याने त्याची लहान काकी लागत असल्याने शेखर साखरे यास अंदाजे ०८:०० वाजता दरम्यान जवळ जावुन त्याला म्हणाली की, 'तुम्ही कशाला भांडण करता, तु मानवेल साखरे याचेवर पोलिस केस केला होतास, आता त्याला नोकरी लागणार आहे, तु केस मागे घे' अशी ती आरोपी शेखर साखरे याला म्हणाली असता आरोपीने तिला शिवीगाळ केली व जास्त शहाणपणा करु नकोस म्हणुन तिचे डावे हातावर ब्लेड मारून दुखापत केली. त्यामुळे फिर्यादीने पोलिस स्टेशन, चामोर्शी येथे जावुन आरोपीविरुध्द तोंडी रिपोर्ट दिली.

३. सदर तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चामोर्शी येथे भा.दं.वी चे कलम ३२४ व ५०४ नुसार अपराध क्र. ७४/२०२२ अन्वये आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. चामोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार सुभाष देवाजी भोयर यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासाअंती आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ च्या गुन्हयासाठी नि.क्र.१० वर आरोप निश्चित करण्यात आले. आरोपीला दोषारोप वाचुन व मराठीमध्ये समजावून सांगीतले असता त्याने तो अमान्य केला व खटला पुढे चालविण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे सदर प्रकरणात एकुण ०५ साक्षीदार तपासण्यात आले. त्यानंतर नि.क्र. ०१ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. फौजदारी प्रकिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन नि.क्रं.४३ वर नोदंविण्यात आले. त्यात आरोपीचा बचाव नकाराचा आहे.

५. सरकारी पक्षाची हकीकत, अभिलेखावर आलेला तोंडी व लेखी पुरावा यावरुन निराकरणासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणासह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १३/०३/२०२२ रोजी २०:०० ते २०:३० वाजताच्या दरम्यान मौजा आंबेडकर चौक चामोर्शी, तह.चामोर्शी, जि. गडचिरोली येथे आरोपीने फिर्यादी उर्मिला बंडु साखरे हिला ब्लेडने मारून इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचा अपमान करुन त्यायोगे कोणत्याही व्यक्तीला प्रक्षोभित करेल आणि अशा प्रक्षोभनामुळे त्याचेकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा, किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे आरोपीचा उद्देश होता व त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| ३. | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुददे कं. १ ते ३ करीता.**

६. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी ०५ साक्षीदार तपासले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

७. फिर्यादी साक्षीदार कं.१ उर्मिला बंडु साखरे हिने तिच्या साक्षीमध्ये कथन केले की, दि.१३.०३.२०२२ रोजी विद्या व दिक्षा रात्री ८.०० ते ८.३० च्या सुमारास भांडत होत्या. त्यावेळी ती घरात होती. ती त्यांना भांडु नका असे बोलली व त्या भांडणामुळे पोलीस स्टेशनला गेल्या होत्या. ती त्या दोघींना पोलीस स्टेशनला का जाता असे सांगण्यास गेली तेव्हा आरोपी घरी होता. ती शेखर साखरे याला बोलली की, मानवेलला डयुटी लागणार आहे, केस कशाला करता. त्यानंतर आरोपी तिच्याजवळ आला व तिला शिवीगाळ केली व तिच्या डाव्या हाताच्या मनगटाजवळ ब्लेड मारून पळुन गेला. त्यानंतर ती दवाखान्यात आली आणि त्या अगोदर ती पोलीस स्टेशनला आली व रिपोर्ट दिली. त्यानंतर तिला होमगार्डने पोलीस स्टेशनमधुन दवाखान्यात नेले. तसेच तिला दाखविण्यात आलेले नि.क्र. २५ वरील रिपोर्टवर सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर दवाखान्यात तिचा उपचार केला. तसेच तिला दाखविण्यात आलेल्या एम.एल.सी. रिपोर्टवर तिची सही आहे. त्यानंतर ती पोलीस स्टेशनला आली व दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद झाला होता. तसेच तिला दाखविण्यात आलेले नि.क्र. २६ वरील छापील प्रथम खबरी अहवालावर सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस १४ तारखेला चौकशीसाठी घरी आले होते तेव्हा अंदाजे ११.५५ ते १२.१५ वाजले होते. त्यानंतर घटनास्थळ तिने दाखविले होते व त्याप्रमाणे पोलीसांनी चौकशी केली आणि पंचनामा केला. तसेच तिला दाखविण्यात आलेले नि.क्र. २७ वरील पंचनाम्यावर सही असुन

त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर तेथे ब्लेड मिळाला होता. तिला दाखविण्यात आलेले नि.क्र.२८ वरील जप्तीपत्रकावर सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. तिला दाखविण्यात आलेला वस्तु क्र. अ वरील ब्लेड असुन तोच आहे असे सांगितले.

८. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात तिने मान्य केले की, आरोपी तिचा पुतण्या आहे. तिने मान्य केले की, तिचे सासरे मरण पावल्यानंतर तिघा भावांना वेगवेगळे घर देण्यात आले. तिने मान्य केले की, आरोपीने त्यांच्याविरुध्द रिपोर्ट दिली होती व त्यात तिघांना शिक्षा झाली होती. आरोपीवरील रागामुळे आरोपीविरुध्द खोटी केस केल्याची बचावाची सुचना सदर साक्षदाराने नाकारली आहे.

९. पंच साक्षीदार क्रं. २ विलास साखरे याने त्याच्या साक्षीमध्ये कथन केले की, आरोपी त्याचा पुतण्या आहे व फिर्यादी ही त्याची भाउ सुन आहे. दि. १४.०३. २०२२ रोजी पंचनामा करण्यात आला होता. त्याला सुचनापत्र दिले नव्हते. त्याला दाखविण्यात आलेले नि.क्र.३१ वरील सुचनापत्रावर सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर पंचनामा आरोपीच्या घराजवळ करण्यात आला. पंचनामा करताना पोलिसवाले कोण होते त्यांचे नाव त्याला माहित नाही. त्याला दाखविण्यात आलेला नि.क्र. २७ वरील पंचनामा तोच आहे व त्यावर त्याची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर तेथे ब्लेड जप्त करण्यात आले होते. त्याला दाखविण्यात आलेला नि.क्र. २८ वरील जप्ती पंचनामा तोच आहे व त्यावर त्याची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. तसेच त्याला दाखविण्यात आलेला वस्तुचिन्ह अ वरील ब्लेड तोच आहे असे सांगितले.

१०. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याने मान्य केले की, पोलिसांनी त्याला घटनास्थळ पंचनाम्यासाठी सुचनापत्र दिले नव्हते व त्यात काय लिहीले आहे हे त्याला वाचुन दाखविले नव्हते. त्याने मान्य केले की, पोलिसांनी त्याला पोलिस स्टेशन बोलावले व तिथे घटनास्थळ पंचनामा बनवला व त्याची सही घेतली. त्याने सांगितले की, त्या ब्लेडची लांबी रुंदी त्याला सांगता येणार नाही. त्यानंतर त्याने ईतर सर्व सुचना नाकारल्या.

११. अभियोग पक्षातर्फे साक्षदार क्र. २ याची फेरतपासणी घेतली असता त्याने

सरतपासात पंचनामा आरोपीच्या घराजवळ झाल्याचे कथन केले आहे व उलटतपासात पंचनामा पोलिस स्टेशनला झाल्याचे कथन केले आहे, यातील पंचनामा आरोपीच्या घराजवळ करण्यात आल्याचे कथन बरोबर आहे असे सांगितले.

१२. साक्षीदार क्रं. ३ बंडु साखरे याने त्याच्या साक्षीमध्ये कथन केले की, दि. १३.०३.२०२२ रोजी त्याच्या दोन्ही मोठया भावांच्या पत्नीचे भांडण झाले त्यावेळी सायंकाळचे ०७:३० ते ०७:४५ वाजले होते. त्यानंतर त्याची पत्नी त्यांचे भांडण सोडवायला गेली. त्यानंतर त्या दोन्ही पोलिस स्टेशनमध्ये आले. त्यानंतर ०८:०० वाजताच्या सुमारास शेखर साखरे त्याच्या घरात आला व त्याच्या पत्नीच्या डाव्या हाताला ब्लेड मारुन फरार झाला त्यामुळे तिचे हात कापुन रक्त निघु लागले. ज्यावेळलेला ब्लेड मारले त्यावेळी तो पत्नीच्या सोबत होता. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याने मान्य केले की, त्याचे वडील मरण पावले तेव्हा त्या तिघा भावांना वेगवेगळे घरे देण्यात आले होते. त्याने मान्य केले की, त्याच्या पत्नीने चावा घेतला या कारणावरुन न्यायालयात केस चालु होती व त्या केसमध्ये त्याच्या पत्नीला शिक्षा झाली आहे. सदर साक्षदाराने त्याच्या पत्नीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष दिल्याची सुचना नाकारली आहे.

१३. वैद्यकिय अधिकारी साक्षीदार क्रं.४ डॉ. अनिकेत अवस्थी यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, दि. १३.०३.२०२२ रोजी ते कंत्राटी तत्वावर वैदयकीय अधिकारी म्हणुन ग्रामीण रुग्णालय चामोर्शी येथे कार्यरत होते. ते ग्रामीण रुग्णालय चामोर्शी येथे एक वर्ष कार्यरत होते. त्यांना उर्मिला बंडु साखरे हिला तपासणी करीता विनंतीपत्र प्राप्त झाले होते. नि.क्र. ३७ वरील पत्र त्यांना दाखविण्यात आले त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. सदर रुग्णाला महिला पोलिस शिपाई पुष्पा उंदिरवाडे यांनी आणले होते. त्यांना रक्ताचे डाग असलेल्या तीन कापलेल्या जखमा आढळल्या. पहिल्या जखमेचा आकार ५ से.मी., दुस-या जखमेचा आकार ६ से.मी आणि तिस-या जखमेचा आकर ७ से.मी. होता. सदर जखमा खोल चिरल्याच्या होत्या व त्या डाव्या हाताच्या मनगटाच्या मागील बाजुस, हाताच्या मध्यभागी होत्या. त्या जखमा साध्या स्वरुपाच्या व एक आठवडयात भरुन येण्याजोग्या होत्या. त्यानंतर त्यांनी एमएलसी अहवाल दिला. नि.क्र. ३८ वरील एमएलसी अहवाल त्यांना दाखविण्यात आले त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. नि.क्र. ३८ वरील एमएलसी अहवालानुसार जखमा शेव्हींग ब्लेडने होवु

शकतात असे सांगितले.

१४. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात कथन केले की, नि.क्र. ३८ वरील एमएलसी रिपोर्ट मधील जखमा धारदार पत्र्याने होवु शकतात. तसेच त्यांनी मान्य केले की, जर पोलिसांनी एखादया गुन्हयातील हत्यार हस्तगत केले तर ते तपासणीसाठी त्यांच्या समक्ष सादर करतात. त्यांनी मान्य केले की, प्रस्तुत गुन्हयातील हत्यार चौकशी अहवालाकरीता त्यांचे समक्ष हजर केले नाही.

१५. तपासी अधिकारी सा़क्षीदार क्रं.५ सुभाष भोयर यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, अपराध क्रमांक ७४/२०२२ चा तपास त्यांना दि.१४.०३.२०२२ रोजी मिळाला. तपासकामी त्यांना एफ.आय.आर व फिर्याद मिळाली. त्यानंतर ते सदर दिवशी ११.३७ वाजता घटनास्थळ पंचनाम्यासाठी गेले व त्यांनी पंचांना सुचनापत्र देवुन विनंती केली. त्यांना नि.क्र. ३१ वरील सुचनापत्र दाखविण्यात आले त्यावर त्यांची व पंचाची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. घटनास्थळ हे चामोर्शी येथे आंबेडकर वार्डात रोडवर आरोपीच्या घरासमोर होते. त्यानंतर घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते. घटनास्थळावर टोपाज ब्लेड टाकुन आरोपी पळाला असे फिर्यादीने सांगीतले. त्यानंतर त्यांनी ते पंचांसमक्ष जप्त केले व तेथे त्यांनी घटनास्थळ पंचनामा व जप्तीपत्रक तयार केले. त्यांना नि.क्र. २७ वरील घटनास्थळ पंचनामा व नि.क्रं.२८ वरील जप्तीपत्रक दाखविण्यात आले त्यावर त्यांची, फिर्यादीची व पंचाची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. तसेच त्यांना वस्तुचिन्ह अ वरील ब्लेड दाखविण्यात आले व तो ब्लेड आर. के. कंपनीचा आहे व तो तोच आहे. जप्तीपत्रकानुसार आर.के. कंपनीचा ब्लेड जप्त केला होता. त्यानंतर ब्लेडला टोपाज देखील म्हणतात म्हणुन त्यांच्याकडुन टोबाज असे कथन झाले. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर त्यांनी वैद्यकिय अधिकारी यांना ब्लेडबाबत अभिप्राय मिळण्यासाठी पत्र दिले. त्यांना नि.क्र. ४१ वरील पत्र दाखविण्यात आले त्यावर त्यांची व वैद्यकिय अधिकारी यांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर संबंधीत डॉक्टरांकडुन अभिप्राय घ्या असे वैद्यकिय अधिका-यांनी लिहुन दिले. संबंधीत डॉक्टर राजीनामा देवुन निघुन गेले म्हणुन अभिप्राय मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी आरोपीला अटक करून चेहरेपटटी फार्म भरला व नि.क्र. ४२ वरील चेहरेपटटी फार्म त्यांना दाखविण्यात आले त्यावर त्यांची व आरोपीची सही असुन

त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी आरोपीविरूध्द पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

१६. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, ते सेवानिवृत्त कर्मचारी आहे. त्यांनी मान्य केले की, त्यांनी सेवेत असताना अश्याप्रकारचे गुन्हयाचे अनेक तपास केले आहेत. त्यांनी सांगितले की, होमगार्ड एमएलसी साठी जावु शकतो किंवा नाही हे त्यांना सांगता येणार नाही. त्यांनी मान्य केले की, आरोपीकडुन हत्यार जप्त केल्यानंतर त्याचा अभिप्राय मिळण्यासाठी वैदयकीय अधिका-यांकडे घेवुन जातात. त्यांनी सांगितले की, त्यांनी या गुन्हयातील हत्यार कोणत्या तारखेला वैदयकीय अधिका-यांकडे घेवुन गेले ती तारीख त्यांना आठवत नाही. त्यांनी सांगितले की, पंचाची नावे रितेश सोरते व विलास साखरे असे होते. त्यांनी सांगितले की, घटनास्थळ पंचनामा पोलिस स्टेशनला करण्यात आला असे पंच साक्षीदाराने का कथन केले हे त्यांना सांगता येणार नाही. त्यांनी सांगितले की, त्यांनी गुन्हयातील ब्लेडबाबत अन्य वैदयकीय अधिका-यांकडुन अभिप्राय घेतला नाही. त्यांनी सांगितले की, सबंधीत डॉक्टरांनी राजीनामा कोणत्या तारखेला दिला हे त्यांना आठवत नाही. त्यानंतर त्यांनी ईतर सर्व सुचना नाकारल्या.

१७. सरकारी वकील श्री.एस.एम.सलामे यांनी युक्तीवाद केला की, साक्षीदार क्र.१ ही जखमी साक्षदार असुन तिचा पुरावा महत्वाचा आहे. तिने तिच्या पुराव्यात घ टनेबाबत विस्तृतपणे कथन केले आहे व आरोपीने तिला ब्लेडने दुखापत केल्याबाबत विश्वसनीय पुरावा दिला आहे. साक्षदार क्र.४ हे वैदयकीय अधिकारी असुन त्यांच्या पुराव्याने साक्षदार क्र. १ हिला झालेल्या दुखापती शाबीत होतात. साक्षदार क्र. २, ३ व ५ यांचा पुरावा देखील जखमी साक्षदाराच्या पुराव्याला बळकटी देणारा आहे. अभिलेखावरील पुराव्याने आरोपीचा गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होतो. त्यामुळे आरोपीला दोषसिध्दी करण्यात यावी अशी विनंती केली.

१८. आरोपीतर्फे वकील श्री. ए.एम.तुरे यांनी युक्तीवाद केला की, फिर्यादीने तिच्या उलटतपासात मान्य केले आहे की, आरोपीने त्यांच्याविरुध्द केस केली होती व त्यात त्यांना शिक्षा झाली होती, त्यामुळे त्या रागावरुन खोटी केस केल्याचा निष्कर्ष काढता येईल. तसेच त्यांनी पुढे नमुद केले की, प्रस्तुत प्रकरणात ब्लेडबाबत वैदयकीय अधिका-यांकडुन अभिप्राय घेण्यात आलेला नाही, त्यामुळे साक्षदार क्र. १ ला झालेल्या

जखमा या ब्लेडने झाल्याचे शाबीत होत नाही. तसेच त्यांनी पुढे नमुद केले की, प्रस्तुत खटल्यात स्वतंत्र साक्षदारांचा पुरावा आलेला नाही, फिर्यादी व आरोपी यांच्यात पुर्ववैमनस्य आहे असे दिसते त्यामुळे केवळ फिर्यादी व हितसंबंधी साक्षदारांचा पुरावा आरोपीला दोषी धरण्यासाठी पुरेसा नाही. त्यामुळे आरोपीला निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

१९. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद विचारात घेतला. साक्षीदार कं.१ हिने तिच्या पुराव्यात कथन केले आहे की, आरोपीने तिला डाव्या हाताच्या मनगटाजवळ ब्लेड मारुन दुखापत केली. नि.क्र.३८ वरील दुखापतीचे प्रमाणपत्रात तिच्या डाव्या हाताला चिरल्याच्या जखमा होत्या असे नमुद आहे. साक्षदार क्र. १ चा तोंडी पुराव्याला साक्षदार क्र. ४ यांचा तोंडी पुरावा आणि वैदयकीय पुरावा नि.क्र. ३८ हे पुष्टी देणारे आहेत. साक्षदार क्र. १ हिने तिला आरोपीने ब्लेडने दुखापत केल्याचे कथन केले आहे व नि.क्र. ३८ मधील जखमा ब्लेडने होवु शकतात असा अभिप्राय साक्षदार क्र. ४ यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात दिला आहे. त्यामुळे साक्षदार क्र. १ व साक्षदार क्र. ४ यांचा पुरावा एकमेकांना दुजोरा देणारा आहे. तसेच गुन्हयातील ब्लेड वैदयकीय अधिका-यासमोर हजर करुन अभिप्राय घेतला नाही यामुळे साक्षदार क्र. १ व ४ यांचा पुरावा नाकारता येवु शकत नाही कारण साक्षदार क्र. १ जखमी साक्षदार हिने तिच्या पुराव्यात घटनेचे वर्णन व हत्याराचे स्वरुप कथन केले आहे, तिच्या पुराव्यात विसंगती दिसत नाही. त्यामुळे साक्षदार क्र. १ व साक्षदार क्र. ४ यांच्या पुराव्यावरुन गुन्हयात वापरलेले हत्यार शाबीत होते. तपासी अधिका-याच्या पुराव्यात ब्लेडच्या कंपनीबाबत आलेल्या किरकोळ विसंगतीमुळे जखमी साक्षदाराचा पुरावा नाकारता येवु शकत नाही. जखमी साक्षदाराचा पुरावा विश्वसनीय स्वरुपाचा असल्याने स्वतंत्र साक्षदारांच्या पुराव्याची आवश्यकता भासत नाही. त्यामुळे आरोपीने साक्षदार क्र. १ हिला ब्लेडने दुखापत केल्याचे शाबीत होते. साक्षीदार कं. १ ते ५ यांचा पुराव्यावर अविश्वास दर्शविण्यासाठी ठोस कारण नाही. जुण्या रागावरुन खोटी केस केल्याचा बचाव संभाव्य वाटत नाही. म्हणुन मी मुद्दा कं.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविले आहे.

२०. आरोपीला भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ साठी दोषी धरण्याकरीता अभियोग पक्षाने सदर गुन्हयांचे घटक शाबीत करणे आवश्यक आहे. आरोपीने काय शिवीगाळ केली याबाबत विस्तृत पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अभियोग

पक्षाचा पुरावा संदिग्ध आहे. त्यामुळे आरोपीविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ प्रमाणेचा गुन्हा संशयाच्यापलीकडे जावुन शाबीत होत नाही. म्हणुन मी मुद्दा कं.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

२१. आरोपीला भा.दं.वी. कलम ३२४ च्या गुन्हयासाठी दोषी धरले आहे. उभय पक्षांचे शिक्षेबाबत म्हणणे विचारात घेतले. आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. ए.एम. तुरे यांनी नमुद केले की, आरोपीचा पहिलाच गुन्हा आहे. आरोपीविरुध्द पुर्व दोषसिध्दी झालेली नाही. आरोपी हा कुटूंबवत्सल असुन त्याचे वृध्द आई-वडील आरोपीवर अवलंबुन आहेत. आरोपीला ताकिद देवुन अपराधी परिविक्षा अधिनियम प्रमाणे लाभ देवुन सोडण्यात यावे. सरकारी वकिलांनी नमुद केले की, आरोपीने गंभीर गुन्हा केला आहे, आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा देवुन साक्षीदारांना आरोपीकडुन नुकसान भरपाई देववावी.

२२. उभय पक्षांचा शिक्षेबाबत युक्तीवाद विचारात घेतला. आरोपीचा पहिलाच गुन्हा दिसतो. आरोपीविरुध्द पुर्व दोषसिध्दी झालेली नाही. आरोपी हा कुटूंबवत्सल असुन त्याचे वृध्द आई-वडील आरोपीवर अवलंबुन आहेत. सदर बाबी व अभिलेखावरील परिस्थिती विचारात घेता मुद्दा क्र.३ साठी खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी शेखर सुरेश साखरे याला भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ अन्वयेच्या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(२) नुसार दोषी धरण्यात येते. आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियम कलम ४ प्रमाणे आरोपीला लाभ देवुन शिक्षेसाठी बोलावले तेव्हा हजर राहण्यासाठीच्या रक्कम रुपये १५,०००/- च्या एक वर्ष मुदतीच्या बंधपत्रावर मुक्त करण्यात येते.

२. आरोपी शेखर सुरेश साखर याला भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

३. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

४. आरोपीने साक्षदार क्र. १ उर्मिला बंडु साखरे हिला नुकसान भरपाईपोटी रक्कम रुपये ३,०००/- दयावे. आरोपीने नुकसान भरपाईची रक्कम देण्यास चुकल्यास आरोपीला दोन महिणे साध्या कारावासाची शिक्षा देण्यात येते.

५. आरोपीने शांतता राखावी व चांगले वर्तन ठेवावे.

६. आरोपी हा एक वर्ष मुदतीकरीता परिविक्षा अधिकारी यांच्या पर्यवेक्षनाखाली राहील.

७. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल क. ६९/२०२३ एक आर.के.स्टेनलेस कपंनीचा ब्लेड मुल्यहिन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

८. या न्यायनिर्णयाची प्रत जिल्हा परिविक्षा अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

९. या न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला विनामुल्य देण्यात यावी.

न्यायानिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.06.02 15:16:53 +0530

दिनांक :-०२/०६/२०२६.

{वाय.जे.वळवी}
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.